मे.पांडुरंग हरी वैद्य
ज्वेलर्स
संजय मोरेश्वर पोतदार ग्रुप कंपनी
BIS
हॉलमार्क दागिने
M.T.N.L. रोड, मिडल क्लास सोसायटी, पनवेल
फोन : ०२२-२७४५४४११

Website : www.killeraigad.com
रायगड जिल्हा आणि नवी मुंबईचे अग्रेसर वृत्तपत्र
दैनिक
# किल्ले रायगड
संपादक : प्रमोद लक्ष्मण वालेकर
सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे

विरेंद्र ज्वेलर्स
विरेंद्रकुमार रतनचंद बांठिया ज्वेलर्स
९१६ हॉलमार्कचे दागिने सौंदर्याचं लेणं
४, महात्मा गांधी रोड, बाजारपेठ, पनवेल-४१० २०६.फोन : ०२२-२७४५ १९८८
E-mail : virendrajewellers@mtnl.net.in

वर्ष ५५ वे : अंक १८१ वा | पनवेल | रविवार दिनांक २० मार्च २०२२ | किंमत : २/- रुपये मात्र | E-mail:killeraigad@gmail.com

## महिला मोर्चातर्फे रविवारी नवीन पनवेलमध्ये 'हळदी कुंकू' आणि 'पैठणीचा' कार्यक्रम





**पनवेल दि. १९ (प्रतिनिधी) : जागतिक महिला दिनानिमित्त तालुका व शहर मंडल भाजपा महिला मोर्चाच्यावतीने रविवार दिनांक २० मार्च रोजी सायंकाळी ५.०० वाजता नविन पनवेल येथे 'हळदी कुंकू समारंभ' आणि 'चला खेळ खेळूया पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

नवीन पनवेल मधील श्री. संत साईबाबा शाळा येथे होणाऱ्या या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेत्या शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा आश्विनी पाटील, उपमहापौर सीता पाटील, महिला मोर्चाच्या प्रदेश सदस्या दर्शना भोईर, महिला व बाल कल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, 'अ' प्रभाग समिती सभापती संजना कदम, 'ब' प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील, 'क' प्रभाग समिती सभापती अरुणा भगत, 'ड' प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, जिल्हा परिषद सदस्या रेश्मा शेळके, पंचायत समिती सदस्या रेखा म्हात्रे, तनुजा टेंबे, यांच्यासह आजी माजी नगरसेविका, पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक यांनी केले आहे.

# द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल रोड ट्रिप मोहीम यशस्वी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले कौतुक

**पनवेल, दि.१९ (प्रतिनिधी) : द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने ०१ डिसेंबर २०२१ पासून ११ मार्च २०२२ पर्यंत देशातील सर्व राज्यांचा समावेश करून १९ हजार पेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास केला असून नुकताच या प्रवासाचा समारोप खारघर येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी या मोहिमेचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.**



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, अनिता पाटील, नेत्रा पाटील, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, जिल्हा चिटणीस गीता चौधरी आदी उपस्थित होते.

द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल ही १०१ दिवसांची रोड ट्रिप मोहीम होती. जी कोविडमुळे प्रभावित झालेल्या लहान आणि सूक्ष्म व्यवसायांना मदत करण्यासाठी, सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, भारत आणि तिची संस्कृती, परंपरा, रीतिरिवाज, पाककृती अशा विविध बाबतीत प्रेरक ठरली. या मोहिमेदरम्यान रोटरी क्लब, रोटरॅक्ट क्लब, एनजीओ क्षेत्र आणि स्टार्ट अप्स आणि लहान व्यावसायिक समुदायांसारख्या विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमधील ८०० पेक्षा जास्त समविचारी लोकांच्या भेटी झाल्या व त्यामध्ये एकमेकांचे विचार मांडण्यात आले.

सपोर्ट युअर बिझनेस या आशयाच्या माध्यमातून सर्व पार्श्वभूमीतील लोकांना सक्षम करणे आणि त्यांच्यासाठी त्यांच्या व्यवसायाचा प्रचार आणि वाढ करण्यासाठी नेटवर्क स्थापन करण्याचे

वृत्त पान ४ वर

# सोमवारी पनवेलमध्ये बौद्ध धम्म परिषद; सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे : महापौर डॉ.कविता चौतमोल

**पनवेल दि. १९ (प्रतिनिधी) : चवदार तळे सत्याग्रह- समता दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ.कविता किशोर चौतमोल व सिद्धार्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक २१ मार्च रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'बौद्ध धम्म परिषद'चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत सर्व उपासक-उपासिका यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.**



महान कारूणिक तथागत सम्यक संबुद्धांनी जो सुख, शांती व दुःखमुक्तीचा मानवतावादी धम्म संपूर्ण विश्वाला दिला त्या अतुलनीय धम्माचे सर्वांना ज्ञान व्हावे या शुद्ध भावनेने बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेला देशभरातील पू. भिक्षू-भिक्षुणी श्रामनेर श्रामनेरी व बौद्ध धम्माचे अभ्यासक उपस्थित राहून धम्मदेशना देणार आहेत. या अनुषंगाने सर्व धम्म बंधू आणि भगिनींनी आपले धम्म कर्तव्य समजून धम्म परिषदेला हजर राहून धम्म ज्ञानाचा लाभ घ्यावा असे आवाहन महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी केले आहे.

सोमवारी सकाळी १०:३० वाजता धम्म ध्वजारोहण, शील ग्रहण, त्रिरत्न वंदना, परित्राण पाठ, ११:३० वाजता भिक्षु संघास भोजनदान, दुपारी १२ वाजता उपासक उपासिका भोजनदान, १:३० वाजता धम्म परिषदेचे उद्घाटन व धम्मदेशना व सायंकाळी ६ वाजता समापन (सरणतय) असे विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पू. भदंत के आर लामा हे असून पू. भदंत करुणानंद थेरो यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. तर पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख हे याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी देशाचे नेते शरद पवार, आदिती तटकरे यांना निवेदन सादर



पनवेल, दि.१९ : नैना प्रकल्पग्रस्त उत्कर्ष समितीचे अध्यक्ष वामन शेळके यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी देशाचे नेते आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती सुनील तटकरे यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे उपस्थित होते.

## बालाजी सिंफोनीतील जळीत महिला मृत प्रकरणाचा खांदेश्वर पोलिसांनी केला उलगडा



पनवेल दि १९,(संजय कदम): सुकापूरमधील बालाजी सिंफोनी मध्ये झालेल्या जळीत कांडचा खांदेश्वर पोलिसांनी छडा लावला आहे. हा सर्व प्रकार पैशाच्या मामल्यातून झाला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

बालाजी सिंफोनी या रहिवाशी संकुलात रुम नं.२८०५ मध्ये सरिता महेश पताडे यांच्यासोबत गौरी शंकर केदारी राहत होते. गौरी केदारी यांनी मोहिनी धनंजय ढमढेरे यांच्याकडून सरकारी नोकरीला लावते म्हणून पैसे घेतले होते. हे पैसे वसुल करण्यासाठी मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे हे बालाजी सिंफोनीत गेले व गौरी हिला घाबरविण्यासाठी मोहिनी हिने बाटलीत पेट्रोल व मेणबत्ती सोबत घेतली होती. रुममध्ये जाऊन गौरीकडून पैशाची मागणी करुन तिला पेट्रोल आणि मेणबत्तीची भीती दाखवली. यावेळी सरिता पताडे यांनी मध्यस्ती करत गौरीला वाचविण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या झटापटीत बाटलीतील पेट्रोल सरिता पताडे यांच्या अंगावर सांडून आगीचा भडका उडाला. या घटनेमध्ये सरिता पताडे पूर्णपणे भाजल्या व त्यांचा जागीच मृत्यू झाला. या नंतर मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे तेथून पसार झाले. गुंतागुतीच्या या प्रकरणाचा खांदेश्वर पोलीसांनी तपास करुन मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे यांचा शोध घेतला व एकाला ताब्यात घेतले आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कामत व त्यांचे पथक दुसऱ्या आरोपीचा शोध घेत आहेत.

## प्राचीन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. मंगेश डाके यांचे गरीब रुग्णावर उपचार

उरण दि. १९ (घन:श्याम कडू) : उरणमधील डॉ. मंगेश डाकी यांच्या पनवेलमधील प्राचीन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आर्थिक परिस्थिती कमकुवत असणाऱ्या गरीब आदिवासी मुलावर उपचार केले आहेत. त्यांनी अनेक रुग्णांना उपचार करून आजवर दिलासा दिला आहे.




पनवेल मधील वाजे गावात कौटुंबिक वादातून हाताला झालेल्या दुखापतीमुळे कातकरी कुटुंबातील आठ वर्षीय राज योगेश कातकरी याला असह्य वेदना होत होत्या. मात्र आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने, उपचार घेता येत नव्हते. याची दखल गावातील साहिल नामक इसमाने घेत सदर प्रकाराची माहिती हॉस्पिटलचे डॉक्टर मंगेश डाके यांना दिली.

वृत्त पान ४ वर

## कर्जत : उल्हास नदीच्या डोहात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

**कर्जत दि. १९ (जयेश जाधव) : धुळवडचा सण साजरा करून पोहण्यासाठी उल्हास नदीवर गेलेले दोन तरुण सांगवी येथील डोहात बुडाले. मात्र, त्यातील एकास जिवंत काढण्यात यश आले असून, एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तीन तासांनी कर्जत पोलिसांनी खोपोली येथील अपघातग्रस्त टीमच्या माध्यमातून तरुणाचा मृतदेह नदीच्या खोल पाण्यातून शोधून बाहेर काढला.**

सांगवी-खांडपे येथील उल्हास नदीच्या डोहामध्ये दुपारी एक वाजता पोहचले होते. त्यावेळी त्या १० जणांच्या ग्रुप मधील दोन तरुण खोल पाण्यात बुडाले. हॉटेल रेडिसन ब्लुच्या बाजूला असलेल्या त्या डोहाच्या बाजूला अनेक गावातील तरुणांना करण धर्मसिंह आणि अक्षय विनोद डोडीया हे दोघे बुडाले असल्याचे लक्षात येताच त्यांच्यासोबत असलेल्या अन्य तरुणांनी आरडाओरड सुरु केली . त्यानंतर स्थानिकांनी त्यातील करण धर्मसिंह यास खोल पाण्यातून बाहेर काढले आणि कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी पाठवले.

बी.बी.बांठीया ज्वेलर्स
सुवर्ण परंपरा विश्वासाची
९१६ हॉलमार्क सोन्याचे दागिने व नवग्रहांचे खडे
७७६,महात्मा गांधी रोड, पनवेल-४१० २०६,जि. रायगड (महाराष्ट्र)
०२२-२७४५ ३३७७/+९१ ९३२२२१०८३२
bbbanthia@gmail.com ☆ www.bbbanthia.com

पन्नालाल केशरचंद बांठिया
सोने, चांदीचे व्यापारी
७७६, एम.जी. रोड, पनवेल-४१० २०६, जि. रायगड.
फोन : ऑ. 2749 1303 नि. 2745 2326
पनवेल मधील सर्वात जुनी व खरी पेढी

PRINCE CREATIONS PVT.LTD.
Kids, Men's & Ladies Wear House of Readymade Garments.
PRINCE COLLECTION
(A Complete Family Showroom)
Shop No. 1/2/3/4 Prabhakar Raje Complex, Shivaji Chowk, Tal. Panvel, Raigad-410206.Ph. No. 022-27461001/27492002
Email- princecreation1001@gmail.com

RKB
राजेंद्र कांतीलाल बांठिया
ज्वेलर्स
११, आर. बी. रंगपरिया रोड, मिरची गल्ली, पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र- ४१० २०६.
मो.९३२२३३३३८७/९७०२३३३३८७

## संपादकीय

# लक्षवेधी निवाड्यानंतर...

हिजाब परिधान करणं हा राज्यघटनेच्या कलम १५ नुसार धर्मस्वातंत्र्याचा भाग असून राज्य सरकार त्याचं उल्लंघन करत आहे, असा आरोप करत काहींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

हिजाब परिधान करणं कलम १५ नुसार धर्मस्वातंत्र्याच्या अधिकारांमध्ये मोडत नसून केवळ संस्थात्मक शिस्त म्हणून शैक्षणिक संस्थांमध्ये हिजाबवर बंदी घालण्यात आली आहे. शैक्षणिक संस्थांच्या आवारात हिजाबवर बंदी नसून केवळ शिक्षण घेत असताना वर्गामध्ये बंदी घालण्यात आली आहे, असं मत कर्नाटक सरकारनं मांडलं होतं. कर्नाटकमधल्या हिजाबबंदीवर उच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश रितू राय अवस्थी यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली तेव्हा राज्याचे महाधिवक्ता प्रभुलिंग नवाडगी यांनी कर्नाटक सरकारची बाजू उच्च न्यायालयात मांडली. 'हिजाब परिधान करणं हे कलम १९ (१)(अ)मध्ये येतं, कलम १५ मध्ये नाही. एखाद्या महिलेची हिजाब परिधान करण्याची इच्छा असेल, तर त्याला कोणताही विरोध नाही,' असं नवाडगी यांनी सांगितलं. कलम १९ (१) अ अतंर्गत ज्या अधिकारांतर्गत हा दावा करण्यात आला आहे, तो कलम १९ (२) संबंधी असून त्यानुसार सरकार संस्थात्मक प्रतिबंधानुसार योग्य प्रतिबंध लागू करू शकतं, असं नवाडगी यांनी निदर्शनास आणलं. राज्यात शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या गणवेशाबाबत राज्य सरकारचा कायदा आहे. हा कायदा शैक्षणिक संस्थांच्या आवारात नाही; मात्र वर्गामध्ये शिक्षण घेत असताना हिजाब परिधान करण्यास बंदी आहे, असं त्यांनी नमूद केलं. त्यानंतर इस्लामिक धार्मिक प्रथांप्रमाणेही हिजाब परिधान करणं आवश्यक नसल्याचं मत कर्नाटक उच्च न्यायालयाने अलिकडेच व्यक्त केलं आणि एका वादंगाला पूर्णविराम मिळाला.

कर्नाटक उच्च न्यायालयाचा निकाल हा केस लॉ म्हणून पुढे येऊ शकतो. शाळांनी ठरवून दिलेल्या ड्रेसकोड व्यतिरिक्त अन्य कोणताही पोशाख घालता येणार नाही, असं हा निकाल सांगतो. न्यायालयाने पूर्वी दिलेल्या निर्देशात भगव्या शाली वापरायलाही बंदी घातली होती. वर्गात धार्मिकतेला महत्व नाही, तर शिक्षणाला आहे, असं हा निकाल अधोरेखित करतो. कर्नाटक उच्च न्यायालयाचा असा निकाल येण्याला कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली, हे ही विचारात घ्यावं लागतं. बरं, हा निकाल काही एका धर्मापुरता आणि एका पेहरावापुरता मर्यादित नाही तर सर्वांना लागू होतो. एखाद्या शाळेत हाफ पँट आणि शर्ट हा गणवेश असेल आणि काही मुलं आम्ही धोतर नेसून येतो, लुंगी घालून येतो, असं म्हणाली तर ते चालणार नाही. वर्गात काय घालायचं, हे ठरवण्याचा अधिकार शाळांना आहे. इथे मूलभूत अधिकारांचं उल्लंघन होत नाही. कर्नाटक शिक्षण कायदा, १९८३ च्या कलम १३३(२) नुसार, सर्वांनी एकाच प्रकारचे कपडे घालणं बंधनकारक आहे. त्यामुळे हिजाब घालणं जसं चुकीचं आहे, तसंच वर्गाबाहेर असताना हिजाबला विरोध करणंही चुकीचं आहे. उच्च न्यायालयाचा निकाल त्यावर व्यवस्थित भाष्य करतो.

कर्नाटक शिक्षण कायद्यानुसार शैक्षणिक संस्था आणि शालेय विकास आणि नियमन समितीला विद्यार्थ्यांचे गणवेश ठरवण्याचा अधिकार आहे. उडुपी आणि चिकमगळूर शहरांमधल्या महाविद्यालयांमध्ये काही विद्यार्थिनींनी वर्गात हिजाब परिधान करायला सुरुवात केली आणि जानेवारीमध्ये या वादाला सुरुवात झाली. २८ डिसेंबर २०२१ ला पहिली घटना उडुपीमध्ये नोंदवली गेली. त्यानंतर तीन सरकारी महाविद्यालयं आणि दोन खासगी संस्था अशा एकूण पाच शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थिनींना हिजाब घालून वर्गात प्रवेश करण्यास मनाई केली होती. उडुपी कॉलेज आणि त्यानंतर कुंदापूर खासगी महाविद्यालयातल्या काही विद्यार्थ्यांनी हे प्रकरण उच्च न्यायालयाकडे नेलं. न्या. कृष्णा यांनी सुनावणीच्या सुरुवातीलाच व्यक्त केलेली भावना अतिशय महत्त्वाची होती. ते म्हणाले, आपण आपल्या सगळ्या भावना कोर्टाबाहेर ठेवू या. आपल्यासाठी आपली घटना हीच आपली भगवतगीता आहे. २०१८ मध्ये केरळमध्ये दोन मुस्लिम शालेय विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या खटल्यात निर्णय देताना न्यायालयाने शिक्षण संस्थेचे अधिकार कायम असल्याचं म्हटलं होतं. तिथल्या शाळेने त्यांना हिजाब आणि फुल बाह्यांचे शर्ट परिधान करण्यास परवानगी नाकारली होती. कर्नाटक उच्च न्यायालयाचा निकालही केरळच्या उच्च न्यायालयासारखाच आहे. स्वातंत्र्याचा अर्थ वैयक्तिक हीत हे सार्वजनिक हितापेक्षा मोठे नसावं, असा असल्याचं न्यायमूर्ती ए. मुहम्मद मुश्ताक यांनी म्हटलं होतं.

# तीन वर्षात २०० हुन अधिक किडनी ट्रान्सप्लांट पूर्ण

**पनवेल, दि.१९ (प्रतिनिधी) : अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने २०० पेक्षा जास्त जीवन-रक्षक किडनी ट्रान्सप्लांट्स तीन वर्षात यशस्वीपणे पूर्ण करून आपल्या रीनल ट्रान्सप्लांट्स प्रोग्रॅममध्ये एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. कोविड महामारीच्या आव्हानात्मक काळात करण्यात आलेल्या किडनी ट्रान्सप्लांट्सचा देखील यामध्ये समावेश असल्याने हे यश अधिक जास्त कौतुकास्पद आहे.**




अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये ट्रान्सप्लांट स्पेशलिस्ट्सच्या अनुभवी टीमने २०० पेक्षा जास्त किडनी ट्रान्सप्लांट्स केले याची घोषणा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या एका पत्रकार परिषदेमध्ये अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईच्या रीनल ट्रान्सप्लांट टीमने काही अशी उल्लेखनीय निरीक्षणे प्रस्तुत केली. ज्यामध्ये दिसून आले आहे की किडनी ट्रान्सप्लांट्समुळे लघु व दीर्घ कालावधीत मिळणाऱ्या अधिक चांगल्या परिणामांसह डायलिसिसच्या तुलनेने अधिक जीव वाचवले आहेत. किडनी ट्रान्सप्लांट्सचा यशस्वी होण्याचा दर ९९% पेक्षा जास्त आहे आणि गुंतागुंतीची ट्रान्सप्लांट्स देखील यशस्वीपणे केली गेली आहेत, ज्यामध्ये एबीओ-इन्कॉम्पॅटिबल (मिसमॅच ब्लड ग्रुप) ट्रान्सप्लांट्स आणि रिपीट (दुसऱ्यांदा) ट्रान्सप्लांट केसेसचा देखील समावेश आहे. अपोलो नवी मुंबई हे रीनल ट्रान्सप्लांट सेंटर केवळ भारतातील नव्हे तर जगभरातील रुग्णांसाठी गुणवत्ता व आशेचा मोठा किरण आहे. कोविडच्या केसेस कमी होऊ लागल्या आणि आंतरराष्ट्रीय प्रवासावरील प्रतिबंध शिथिल केले जाताच मेडिकल व्हॅल्यू ट्रॅव्हल पुन्हा सुरु झाले.१५ परदेशी रुग्णांवर किडनी ट्रान्सप्लांट सर्जरी यशस्वीपणे करण्यात आल्या.

अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईचे कन्सल्टन्ट रोबोटिक युरॉलॉजिस्ट आणि रीनल ट्रान्सप्लांट सर्जन डॉ.अमोलकुमार पाटील यांनी सांगितले, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये सर्जिकल तंत्रज्ञानाचे सतत अपग्रेडेशन केले जाते, आजच्या काळात कमीत कमी इन्व्हेसिव्ह तंत्र सर्वात जास्त वापरली जातात. यामुळे सर्जरीनंतर होणाऱ्या वेदना अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रणात ठेवता येतात, रुग्णाची तब्येत लवकरात लवकर बरी होते आणि शरीरावर सर्जरीच्या खुणा देखील राहत नाही आधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानासह अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये रुग्णांवर केले जाणारे उपचार आणि त्यांच्या परिणामांचे असे पर्याय उपलब्ध आहेत जे जगातील सर्वोत्कृष्ट पर्यायांच्या तोडीचे आहेत. सकारात्मक क्लिनिकल परिणाम आणि जागतिक स्तरावरील अनुभवांमुळे अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई हे भारत आणि जगभरातील रुग्णांसाठी एक लोकप्रिय पर्याय बनले आहे.

अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईचे रिजनल सीईओ वेस्टर्न रिजन संतोष मराठे यांनी सांगितले, भारतात पहिली ऑर्गन ट्रान्सप्लांट रजिस्ट्री विकसित करण्यापासून भारतातील काही महत्त्वाच्या किडनी ट्रान्सप्लांट सर्जरी करण्यापर्यंत, अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामार्फत सक्षम ट्रान्सप्लांट सर्जरीसह दर्जेदार परिणाम प्रदान करण्यात नेहमी आघाडीवर आहे. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये किडनी ट्रान्सप्लांट टीमचे नेतृत्व देशातील काही सर्वोत्तम व अनुभवी ट्रान्सप्लांट सर्जन्स करत आहेत. टीमला विविध क्षेत्रातील विशेषज्ञांचे सहकार्य मिळते, ज्यामध्ये नेफ्रोलॉजिस्ट्स, युरॉलॉजिस्ट, ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर, सामाजिक कार्यकर्ते, मनोवैज्ञानिक आणि एनेस्थिसियोलॉजिस्ट यांचा समावेश आहे, ही टीम जगभरातील सर्वोत्कृष्ट परिणामांच्या तोडीचे परिणाम प्रदान करते. आम्हाला आमच्या सेवांच्या पोर्टफोलिओमध्ये किडनी ट्रान्सप्लांट सेंटरमार्फत प्रदान केल्या जाणाऱ्या विशिष्ट सेवांचा अभिमान वाटतो.

यावेळी अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईचे चीफ कन्सल्टन्ट नेफ्रोलॉजिस्ट आणि ट्रान्सप्लांट फिजिशियन डॉ अमित लंगोटे, कन्सल्टन्ट नेफ्रोलॉजिस्ट आणि किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन डॉ रवींद्र निकलजी, जॉईंट मेडिकल डायरेक्टर डॉ रवी शंकर यांनीही रीनल ट्रान्सप्लांट प्रोग्रॅमच्या यशाबद्दल माहिती दिली.

# १० लाखाची खंडणी मागणाऱ्या चौकडीला वडखळ पोलिसांनी केले गजाआड

**पेण दि.१९ (प्रतिनिधी) : भारत सरकारच्या नावाच्या खोट्या पाटीचा गाडी साठी वापर करून शासकीय अधिकारी असल्याचे भासवून पेण तालुक्यातील डोलवी येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या अधिकाऱ्याला शिवीगाळ करुन १० लाख रुपयांची खंडणीची मागणी करणाऱ्या चौघांना वडखळ पोलिसांनी गजाआड केले आहे.**




सविस्तर वृत्त असे की, डोलवी येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या धरमतर येथील कार्यालयात गुरुवारी सकाळी आरोपी गणेश पोळ, रा. चेंबूर-मुंबई, जीवन महापुरे, रा. राजाराम पुरी, कोल्हापूर, महेंद्र बनसोडे रा. डेरवली, पनवेल यांनी आपण केंद्र शासनाचे शासकीय अधिकारी असून यावेळी त्यांच्या बरोबर असणाऱ्या मुरलीधर पाटील, रा. बहिरीचा पाडा, यांनी अलिबाग धरमतर-मानकुळे खाडीत बेकायदेशीर सुरु असलेला व्यवहार बंद करण्या संदर्भात सकाळी भारतीय राजमुद्रा असलेल्या लेटरपॅड वर अर्ज दिला होता. या बाबत विचारणा करण्यासाठी ही चौकडी सायंकाळी कंपनीच्या कार्यालयात येऊन दिलेल्या अर्जावर काय भूमिका घेतलीत अशी विचारणा केली. कंपनीतील पीआरओ डिपार्टमेंट मधील असिस्टंट मॅनेजर मंगेशकुमार थत्ते यांना शिवीगाळ करून हे प्रकरण मिटवायचे असेल तर दहा लाख रुपये दे नाहीतर आताच तुला मारून धरमतर खाडीत टाकतो, तुझी कंपनी बंद करतो अशी धमकी दिली.

या बाबत मंगेशकुमार थत्ते यांनी कंपनीचे सिक्युरिटी अधिकारी मंगेश नायगम व सुरेश कुमार यांच्या सोबत याबाबत वडखळ पोलिसांत तक्रार दाखल केली. वडखळ पोलिसांनी या चौघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. यावेळी पोलिसांनी भारत सरकारच्या नावाची बनावट पाटी असलेली क्वालिस गाडी व बनावट लेटर हेडसह ताब्यात घेतले. ते चौघेही शासकीय अधिकारी नसल्याचे आढळून आले. त्यांच्या वर वडखळ पोलीस ठाण्यात भा द वि कलम ३८७, ३८५,१७०, ४७३, ५०४, ५०६, ४२० व ३४ अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार अधिक तपास करीत आहेत.

# महिला दिनानिमित्त स्नेहसंमेलन साजरे

**पुणे दि. १९ (बाबू डिसोजा याजकडून) : पिंपरी चिंचवड प्राधिकरण- दि. १५ मार्च ला स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या महिला विभागाचे महिलादिनाच्या निमित्ताने आयोजित केलेले स्नेहसंमेलन अतिशय उत्साहवर्धक आणि जल्लोशपूर्ण वातावरणात पार पडले. मंडळाच्या अनेक सदस्या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या आणि सर्वांचेच सादरीकरण खूपच सुंदर होते.**



भजन, भावगीते, चित्रपटगीते, लोकगीते, भारुड, कविता, नाट्यछटा, उखाणे, विनोदी किस्से, योगासने अशा सगळ्याच कलांचा कार्यक्रमात समावेश होता. त्या निमित्ताने सदस्यांमधील विविध गुणांचे दर्शन झाले आणि खऱ्या अर्थाने विविध गुणदर्शन म्हणता येईल असा कार्यक्रम झाला.

मैत्रिणींना प्रोत्साहन द्यायला आणि त्याच्या सादरीकरणाला दाद द्यायला विभागातील सदस्यांची अतिशय उल्लेखनीय अशी उपस्थिती होती. सर्वांच्याच सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली.त्यानंतर सरस्वती पूजन आणि भारतमाता पूजन चा कार्यक्रम झाला. स्वागत आणि प्रास्ताविक विनिता श्रीखंडे यांनी केले. अध्यक्षा शिल्पा बिबीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि त्यानंतर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनिता श्रीखंडे आणि नम्रता चिटणीस यांनी आपल्या खुमासदार शैलीत केले.

या नंतर स्वराज्य ७५ निमित्ताने पथनाट्य झाले. राष्ट्र सेविका समिती, यमुनानागर, बालशाखा यातील मुलींचा सहभाग असलेले हे पथनाट्य अतिशय प्रभावी असेच झाले. उज्वला जाधव यांनी आभार व्यक्त केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. शेवटी सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमाला ९० महिला विभाग सदस्या आणि २० स्वराज्य ७५ निम्मित पथनाट्य टीम अशी एकूण ११० एवढी उपस्थिती होती.

# खारघर : डोंगरावर लागलेल्या आगीची चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी

**नवीन पनवेल, दि.१९ : खारघर मधील डोंगरावर लागलेल्या आगीसंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा व पर्यावरणाचा विध्वंस करणाऱ्या व खारघर डोंगरावरील वनसंपदा, पक्षी, प्राणी याना आगीत भस्मसात करणाऱ्यांवर कायदेशीर कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी खारघर पोलिसांकडे केली आहे.**



दोन दिवसांपूर्वी खारघरमधील डोंगरावर मोठ्या स्वरूपात आग लागली. या आगीत मोठ्याप्रमाणावर डोंगरावर राहणारे पशुपक्षी, प्राणी होरपळून मृत्युमुखी पडले. दरवर्षी खारघर डोंगरावर काही अज्ञात गुंड व अपप्रवृत्तीच्या व्यक्तींकडून आग लावण्यात येते. त्यानंतर बेसुमार वृक्षतोड करण्यात येते. स्थानिक वन अधिकारी याला जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. खारघरमध्ये लागलेली आग ही पूर्वनियोजित असावी, आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन गाड्या व मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागले. तरी ही आग आटोक्यात आलेली नव्हती. या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून गुन्हा दाखल करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा आणि नवी मुंबईचे अग्रेसर वृत्तपत्र
किल्ले रायगड
सर्व प्रकारच्या जाहिरातींसाठी एक सर्वोत्कृष्ठ प्रभावी माध्यम
प्रमोद वालेकर : 9869688453
प्रदिप वालेकर 9819470140

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी श्रीमती अलका राजेश ठाकूर, राहणार मु.पो. चिर्ले ता. उरण, जि. रायगड यांच्या मालकी वहीवाटीच्या मौजे-विंधणे, ता. उरण, येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-विंधणे, ता. उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १. | ३०८ | १/ब | ०-९०.६० पैकी विक्रीचे क्षेत्र ७.५ गुंठे | ६-२५ |
| २. | २६५ | - | १-५८.८० पैकी विक्रीचे क्षेत्र ११ गुंठे | ११-५६ |

वर नमुद केलेल्या मिळकती म्हणजेच मौजे-विंधणे येथील सर्व्हे क्र. ३०८/१/ब, एकुण क्षेत्र- ० हे - ९० आर. ६० पॉ. या मिळकतीपैकी श्रीमती अलका राजेश ठाकूर यांच्या हिस्स्यांचे ०-हे-७आर.५पॉ. (७.५ गुंठे) तसेच सर्व्हे क्र. २६५, एकूण क्षेत्र-१ हे-५८ आर ८० पॉ. या मिळकतीपैकी श्रीमती अलका राजेश ठाकूर यांच्या हिस्स्याचे ० हे-११ आर.० पॉ (११ गुंठे) या मिळकती व सदर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतींचे मालक श्रीमती अलका राजेश ठाकूर यांच्याकडून आमचे अशिल मे. लॅन्डलॉर्ड कंपनी, पत्ता : ५०२, मयूरेश चेंबर, प्लॉट नं. ६०, सेक्टर - ११, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई यांनी कायम स्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू., हुकुमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील दामोदर परशुराम पाटील यांचे मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल,
दि. : २०/०३/२०२२

सही/-
**श्री.विशाल अनंत मुंडकर**
ॲडव्होकेट
पत्ता : शॉप क्र.२, पवन को-ऑप.हौसिंग सोसायटी, कै. रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टा समोर, पनवेल - ४१०२०६. जि. रायगड.

# को.ए.सो.च्या सेवानिवृत्त मुख्यापकांचा स्नेह मेळावा

**पनवेल दि. १९ : कोकण एज्युकेशन सोसायटीचे निवृत्त मुख्याध्यापक दरवर्षी एकत्रित जमतात. जुन्या आठवणींना उजाळा देतात. गप्पा टप्पा होतात. करमणुकीचे कार्यक्रम ही होतात. अशाच प्रकारचा स्नेह मेळावा काल पनवेल येथे झाला. बी. पी. म्हात्रे (पनवेल) आयोजक होते. या मँचाला नियमावली नाही. पदाधिकारी नाहीत. वर्गणी नाही . उद्घाटक नसतो. तरीही मेळावा दरवर्षी होतो. प्रायोजकही मिळतो. निमंत्रक अन्य व्यवस्था करतो. बळवंत वालेकर व अ. प्र. देशमुख हे काम २२ वर्षे करीत आहेत.**

पनवेल येथे हा स्नेह मेळावा पार पडला. सदर मेळाव्यास रायगड जिल्ह्यासह पुणे, ठाणे, सोलापूर, कोल्हापूर, उस्मानाबाद येथून ४९ सदस्य उपस्थित होते. प्रारंभी श्रद्धांजली वाहिल्यानंतर निमंत्रक बळवंत वालेकर यांनी प्रास्ताविक भाषण केले व शेवटी निमंत्रक अ. प्र. देशमुख यांनी आभार मानले. जुन्या आठवणी, निवृत्तीच्या काळात करीत असलेले सामाजिक व शैक्षणिक काम या बाबत ज्येष्ठ सदस्य पी. जी. कुलकर्णी व स. रा.मेहेंदळे तसेच एस एम. ठाकूर, अ. प्र. देशमुख, बळवंत वालेकर, बी. पी. म्हात्रे, श्रीकांत पाटील, जगन्नाथ जांभळे, शेषराव सोनुने इ. सहभागी झाले. या मेळाव्यास जी. टी राऊत, ए. व्ही. सोमण, प्रज्ञा जोशी, संजीवनी जोशी, शारदा वालेकर, अंजली भगत. माणिक राऊत, भादेकर यांच्यासह ४९ निवृत्त मुख्याध्यापक उपस्थित होते. बी.पी.म्हात्रे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मेळाव्याची उत्तम व्यवस्था केली होती.

डिझायनर इंटिरिअर ॲंड लॅंडस्केपिंग
आपल्या घराचे, बंगल्याचे, ऑफिसचे, दुकानाचे मनमोहक इंटिरिअर तसेच फार्म हाऊस डेव्हलपिंग व गार्डनिंग आपल्या बजेटप्रमाणे करुन मिळेल
अनिल मेहेतर
९१६७५५३७३७
८०९७९७६७२७

# स्कुटी चालकाचा अपघाती मृत्यू

पनवेल दि,१९(वार्ताहर):डी पॉईंटकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या रोडने पुष्पकनगर ब्रिजवर स्कुटीला पाठीमागून अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत सुधीर पुंडलिक पाटील (वय ४५) घेसरगाव, निळजे यांचा मृत्यू झाला आहे. अज्ञात वाहनचालकाविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

होंडा एक्टिवा स्कूटी क्रमांक एम एच ०५ एस २६०६ ही घेऊन सुधीर कुंडलिक पाटील निघाले होते. पुष्पकनगर पुलावर त्यांना पाठीमागून एका अज्ञात वाहनाने धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अज्ञात वाहनचालक वाहनासह पळून गेला आहे.

# जागर शासन योजनेचा : आधार लोककलेचा

**ढोलकीवर थाप पडली, माणसं जमा होऊ लागली. काहीतरी कार्यक्रम सादर होणार याची आपआपसात चर्चा होऊ लागली. तेवढयात माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाचे फलक असलेले कलापथकाचे बोर्ड समोर दिसले. मी मुद्दाम थांबलो. आघाडी शासनाच्या दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची यासाठी प्रचार प्रसिध्दीचे कार्यक्रम सुरु झाल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसिध्द झाल्या होत्या.**

गर्दीतून वाट काढत पांढरा झब्बा आणि जिन्स पॅन्ट घातलेले ७ ते ८ तरूण पुढे आले. ढोलकीची थाप अधिक वेगाने वाजू लागली. सुत्रधाराने त्याच्या गोड गळयाने ताण धरली. जय..जय.. महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा. इतर साथीदार त्याला साथ देऊ लागले. खड्या आवाजातील महाराष्ट्र गीताने उभे असणारे प्रेक्षक उत्स्फूर्तपणे महाराष्ट्राचा जयघोष करू लागले. जय शिवाजी, जय भवानी या घोषणाही उत्साही लोकांनी दिल्या. सुत्रधार आणि त्याचे साथीदार महाविकास आघाडीने कोकणात केलेल्या विकास कामांची माहिती देत होते.

तेवढयात ऐकाने त्याच्या खासशैलीत संवाद टाकला कुछ तो लोग कहेंगे, लोगोंका काम है कहना दुसऱ्या साथीदाराने लगेच त्यावर उत्तर दिले. जे आम्ही बोलतो तेच करतो, नव्हे करून दाखवतो. आणि मग कोरोना काळात शासनाने सर्वाधिक ऑक्सीजन निर्मितीचे प्लॅन्ट उभे केल्याची माहिती दिली. अधून मधून ढोलकीवर थाप पडत होती. लोकांच्या टाळ्या, हाशा यामुळे कार्यक्रम रंगत होता.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षात झालेल्या विकासकामांची माहिती दिली जात होती. सर्वसामान्य माणसाला त्याच्या भाषेत समजेल अशा पध्दतीने विकास कामे सांगितली जात होती. शेती, पणन,

**प्रविण डोंगरदिवे**
माहिती सहाय्यक,
विभागीय माहिती कार्यालय,
कोकण विभाग, नवी मुंबई

फलोत्पादन, सहकार, खारजमीन, ग्रामविकास, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, मत्स्यव्यवसाय, मृद व जलसंधारण, शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, क्रीडा व युवक कल्याण, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य अशा कितीतरी योजना एकापाठोपाठ सांगितल्या जात होत्या.

आबुराव आाणि बाबुराव लोकांचे लक्ष वेधून घेत होते. राजा आणि प्रधानजीचे संवाद लोकांना हसवत होते. मनोरंजनाच्या माध्यमातून लोककलांचा जागर' कोकणातल्या वाड्यावस्तींवर होत होता. अर्ध्यातासानंतर पुन्हा एकदा महाराष्ट्र गीत' झालं. आणि कार्यक्रम संपला.

कोकण विभागात ९ मार्च ते १७ मार्च या कालावधीत ठाणे जिल्हयात-६३, रत्नागिरी-६३, पालघर-६३ रायगड-६३ असे कोकण विभागात एकूण २५२ कार्यक्रम झाले. त्यासाठी १२ कलापथकातल्या १०० च्यावर कलाकारांनी शासन योजना कोकण विभागातील गावोगावी, खेडोपाड्यात, वाड्यावस्तीतील लोकांपर्यंत पोहोचवल्या. शासनाने यावर प्रचलित नियमानुसार १४ लाख एवढा खर्च कोकण विभागासाठी केला. माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव दिपक कपूर साहेबांच्या आलेल्या कल्पनेतून हा कार्यक्रम कोकण विभागात यशस्वी झाला होता.

आजच्या आधुनिक युगात टिव्ही, इंटरनेट, मोबाईलमध्ये रमलेल्या प्रेक्षकांना लोककलावंताच्या तोंडून भर रस्त्यात शासन योजना सांगतांना पाहून खूप छान वाटत होते. शासनाचा हा उपक्रम पुन्हा पुन्हा व्हावा, अशा अपेक्षा नागरिक व्यक्त करीत होते. कलापथकाची मंडळी समोरच्या टपरीवर चहा पिऊन पुढच्या कार्यक्रमासाठी मार्गस्थ झाली. मी देखील निघालो. मनात मात्र एकच गोष्ट लक्षात येत होती. महाविकास आघाडी शासनाने एवढया गोष्टी केल्या त्याची माहिती आठवत होतो. परत येत असतांना आघाडी शासनाला नकळत धन्यवाद दिले आणि मार्गस्थ झालो.

# ज्येष्ठ नागरिक संघात महिला दिन साजरा




**पनवेल दि. १९ (प्रतिनिधी) : येथील पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघात ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ९ मार्च २०२२ रोजी, बुधवारच्या सभेत ॲड. संतोषी चव्हाण यांचे व्याख्यान आयोजित केले होते.**

प्रथेप्रमाणे सचिव गुर्जर यांनी आठवड्यातील सभासदांचे वाढदिवस साजरे केले. त्यानंतर अनुप्रिता काळण, माधुरी गुर्जर व दत्ता ढोले यांनी महिला दिनासंबंधी कविता सादर केल्या. कविता ठाकूर यांनी स्वामी विवेकानंदांची आठवण सांगताना भारतीय नारी ही इंग्लंडच्या राणीप्रमाणे स्वतःराणी आहे. त्यामुळे परपुरुषाबरोबर ती हस्तांदोलन करीत नाही. त्या पुढे म्हणाल्या ज्याला स्त्री आई म्हणून समजली तो जिजाऊंच्या शिवबा झाला. ज्याला बहिण म्हणून समजली तो राधेचा शाम झाला व ज्याला पत्नी म्हणून समजली तो सीतेचा राम झाला.

ॲड. संतोषी चव्हाण यांनी नवीन पिढीला सुसंस्कार नको आहेत. पाश्चात्य अंधाकुरण करुन, खाण्याच्या, पोशाखाच्या बाबत ही मंडळी स्वैर वागतात. त्यांना ज्येष्ठांनी मार्गदर्शन करावे. स्त्रीयांना कोणतीही गोष्ट झगडून मिळवावी लागते. त्या कारणामुळे ८ मार्च हा जागतिक महिला दिन सुरु केला. पुढे त्यांनी ज्येष्ठ नागरिक पालन पोषण कायद्याची माहिती देऊन जर आवश्यक असेल तर मोफत सल्ला देण्याचे कबूल केले. शेवटी अध्यक्ष नंदकुमार जोशी यांनी उपस्थित सभासद पाहुण्यांचे आभार मानले. पसायदानाने महिला दिनाचा कार्यक्रम समाप्त झाला.

# अ.भा. छावा संघटनेतर्फे रयतेच्या आणि समतेच्या राज्यासाठी पनवेल मध्ये शिवराय ते भीमराय समता मार्च



**पनवेल दि. १९ : आज दि.१९ मार्च २०२२ रोजी सकाळी ८ वाजता पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक अशा मार्गावर अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने समता मार्च काढण्यात आला. यावेळी डॉ. सपकाळ, डी.डी. गायकवाड, धनंजय घरात, प्रसाद परब, गोपी खरात, रवि रोटे वृत्तिक जठार, प्रणय नितनवरे, प्रणय गंगावणे महेंद्र कांबळे आणि संविधान प्रचारक प्रविण जठार उपस्थित होते.**

रयतेने ही झाडे लाऊन लेकरासारखी बहुत काळ जतन करुन वाढविली. ती झाडे तोडिलियावरी त्यांचे दुःखास पारावार काय?' जिजाऊंच्या पाचाड येथील समाधी परिसरात लावलेल्या शिवरायांच्या आज्ञापत्रातील या ओळी. रयतेची प्रचंड काळजी वाहणाऱ्या आणि म्हणूनच महाराष्ट्राला ललामभूत झालेल्या शिवछत्रपतींची राजधानी किल्ले रायगड ही तेच नाव दिलेल्या रायगड जिल्ह्यात आहे.

याच रायगड जिल्ह्यातील महाड येथे १९२७ साली समतेच्या अधिकारासाठी एक महान संगर घडला.चवदार तळ्यावर झालेल्या या सत्याग्रहाचे अहिंसक सेनानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संगराचे वर्णन करताना म्हणतात-हा संगर केवळ पाण्यासाठी नसून मानवी मूलभूत हक्कांसाठी आहे.' त्यांचे हे विधान चवदार तळ्यावरील बाबासाहेबांच्या पुतळ्याखाली कोरलेले आपल्याला पहायला मिळते. याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पुढे रयतेला देशाची मालक करणारे समता, स्वातंत्र्य, बंधुतेचा घोष करणारे भारतीय संविधान सिद्ध झाले.

आज या दोन महामानवांना विभूति करुन त्यांच्या मानवी कर्तृत्वाला व विचारांना धूसर करण्याचे तसेच त्यांना विशिष्ट समाजविभागांत बंदिस्त करण्याचे संकुचित प्रयास जोरात चाललेले आहेत. अशावेळी या दोन कृतिशूर महामानवांच्या प्रेरणा व विचारस्रोताला अभिवादन करून त्यांच्या विचारांचा जागर व ते अमलात आणण्यासाठीचा संकल्प जाहीर करण्यासाठी त्यांच्या रायगड जिल्ह्यातील या कर्मभूमीत विविध समाजघटकांत व विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटना एकत्र येऊन समतामार्च' आयोजित करत आहेत. महाडच्या चवदार तळ्यावरील बाबासाहेबांची सत्याग्रह परिषद १९ व २० मार्च १९२७ ला झाली. प्रत्यक्ष सत्याग्रह २० मार्चला परिषदेच्या अखेरीस संपन्न झाला. मात्र याबाबतचा ठराव व संपूर्ण आखणी ही १९ मार्चला झाली होती. १९ मार्चचे हे औचित्य ध्यानी घेऊन समता मार्चचे आयोजन महाराष्ट्रात ठीक ठिकाणी करण्यात आले.

# कंपनीच्या वेअर हाऊसमध्ये चोरी

पनवेल दि,१९(वार्ताहर): कंपनीच्या वेअर हाऊसमध्ये असणाऱ्या बोट कंपनीच्या डिजिटल स्मार्ट वॉच व ब्लूटूथ स्पीकरचे कार्टून काढून त्यातून एक लाख ३९ हजार रुपये किमतीचे वॉच, ब्लूटूथ स्पीकरची चोरी केल्याप्रकरणी तिघांविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पाडेघर जेडब्ल्यू आर कंपनी येथे मालाच्या गोडाऊनवर लक्ष ठेवण्याकरता ११४ सिक्युरिटी गार्डची नेमणूक करण्यात आली आहे. चायना देशातून बोट कंपनीचे ब्लूटूथ स्पीकर आणि वॉच आयात करण्यात आले होते. हे सील तोडून वेअर हाऊसची पाहणी केली असता वेअर हाऊसमधील कार्टून फाटलेले दिसून आले. त्यावेळी वेअरहाऊसमध्ये चोरी झाली असल्याचे प्रवीण वर्तक यांच्या लक्षात आले. संकेत रामटेके (उरण), मिथुन म्हात्रे (उरण) आणि अनिकेत पारधी (वज्रेश्वरी) यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# नेरूळ : आरोग्य शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल दि. १९ : आयुष मंत्रालयाच्या सूचनावलीनुसार आजादी का अमृत महोत्सव "अंतर्गत डी.वाय. पाटील आयुर्वेदिक हॉस्पिटल नेरूळ व दिलीप घोडेकर उप-जिल्हाप्रमुख शिवसेना जनसंपर्क कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.१६ मार्च २०२२ रोजी नेरूळ येथे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.**

या शिबिरामध्ये सांध्याचे व मणक्याचे विकार, मधुमेह तपासणी, दमा तपासणी आदि विकारांवर तज्ञ डॉक्टरांद्वारे मोफत तपासणी, पी.एफ.टी (फुफ्फुसांची तपासणी) रक्तातील शर्करा तपासणी मोफत करून मोफत औषधी वाटप करण्यात आले. या शिबिराचा १०० हून अधिक रूग्णांनी लाभ घेतला. या शिबिराचे आयोजन डी.वाय. पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. विजय पाटील यांच्या प्रेरणेने डॉ. आशिष म्हात्रे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. सदरच्या शिबिराच्या आयोजनाकरिता विभागप्रमुख डॉ. पाडवी यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. सदरच्या शिबिरामध्ये डॉ.आशिष म्हात्रे यांच्या सह विभागप्रमुख डॉ. पाडवी, डॉ.निखिल जोगळेकर, डॉ. अर्चना काशीद, डॉ. गिरीष काळे व डॉ. जयन्ती दत्ता सहभागी झाले होत. सदरचे शिबिर यशस्वी करण्याकरिता दिलीप घोडेकर यांचे बहूमूल्य सहकार्य लाभले.

# पत्रकार राकेश खराडे यांची मोहोपाडा गावच्या पाटीलपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड



**रसायनी दि.१९ (प्रतिनिधी) : मोहोपाडा गावचे धडाडीचे तरुण व सामाजिक कार्यकर्ते पत्रकार राकेश काशिनाथ खराडे यांची ग्रामस्थ मंडळाने मोहोपाडा गावचे पाटील म्हणून दुस-यांदा फेरनिवड केली असून ती बिनविरोध झाली आहे. पत्रकार राकेश खराडे यांचे गावांसाठी योगदान, कार्यकुशलता,व व्यक्तिमत्त्व पाहून त्यांची मोहोपाडा गावचे पोलिस पाटील म्हणून दुस-यांदा बिनविरोध निवड झाली आहे. याबाबत पत्रकार राकेश खराडे यांना मोहोपाडा होळीपुजनाचा मानही देण्यात आला.**

मोहोपाडा ग्रामस्थांनी माझ्यावर टाकलेला विश्वास मी सार्थ करणार असून ग्रामस्थांसमोरील समस्या सोडविण्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहणार असल्याचे पत्रकार राकेश खराडे यांनी बोलताना सांगितले.

# नगरसेवक मुकीत काजी यांचे निधीतून पटेल मोहल्ला तलावाच्या सुशोभिकरणाचे काम सुरू



**पनवेल वॉर्ड नं. १४ चे भा.ज.पा.चे मुकीत काजी यांचे नगरसेवक निधीतून पटेल मोहल्ला तलावाच्या सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. लवकरच या तलावाचे नवे स्वरूप पहायला मिळेल. (छाया- वसीम पटेल)**

**साक्षर रायगड स्वयंपूर्ण रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील **श्री. सुरेश विठ्ठल चौधरी** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**शेत जमिनीचे वर्णन**
**मौजे - चिखले, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २६ | १ | १-५०-०० | २५.८२ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकाची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.
दिनांक : २०/०३/२०२२

**श्री. अमोल शंकर साखरे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपींग कॉम्प्लेक्स
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. ९३२४३७२१६६

---

मा. अस्मार साहेब कोर्ट | ॲड. प्रेरणा एम. ढौल

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. जिल्हा न्यायाधीश पनवेल-रायगड यांचे कोर्टात**
दि.चौ.अर्ज क्र.२२/२०२२ नि.६/ड ने.ता. २१/०४/२०२२

**श्रीमती रेवती नितीन काकडे,**
वय- ३५ वर्षे, धंदा- गृहीणी,
रा. ३२४ प्रशांत निवास, वरची आळी,
विठ्ठल मंदिर जवळ, सेक्टर ३, मु. बेलपाडा,
पोस्ट- खारघर, रायगड, महाराष्ट्र- ४१०२१० } अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै. नितीन नामदेव काकडे** हे **दिनांक ०२/०६/२०१७** रोजी **मौजे-खारघर, ता. पनवेल, जि. रायगड** येथे मयत झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी श्रीमती रेवती नामदेव काकडे ह्या अर्जदार यांनी **कु. रूचीता नितीन काकडे व कु. रूणाली नितीन काकडे** यांचा खालील मिळकती संदर्भात अज्ञान पालक म्हणुन घोषित करून मिळणेसाठी मा. न्यायालयात गार्डीयन ॲण्ड वार्डस ॲक्टप्रमाणे मा. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे- खारघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| अनु.क्र. | सदनिका | इमारतीचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १. | ९०३, ९ मजला | श्री. राम गितांजली गार्डन, सेक्टर १०, प्लॉट नं. २२९ | ५४.४७० चौ.मीटर कारपेट एरिया |

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांनी **कु. रूचीता नितीन काकडे** व **कु. रूणाली नितीन काकडे** यांचा अज्ञान पालक असल्याचा दाखला मिळण्याकरीता सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांस पालकत्वाचा दाखला देण्याबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदाराकडुन कायदेशिर साक्षीपुरावे नोंदवुन अर्जदारास पालकत्वाचा दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**क. लिपिक, जिल्हा न्यायालय, पनवेल-रायगड** | कोर्टाचा शिक्का | **सहा. अधिक्षक, जिल्हा न्यायालय, पनवेल-रायगड**

---

मा.श्री.राव सो. यांचे कोर्टात | ॲड.श्री. स्वप्नेश सं.घरत अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात**
दिवाणी चौकशी अर्ज क्र.३९१/२०२२ नि.क्र.८/ड ने.ता.०४/०५/२०२२

**कुमार स्नेहल बाळाराम जोशी,**
वय- २७ वर्षे, धंदा- शेती,
रा. घर क्र. ७३, मु. वेश्वी, पो. दिघोडे,
ता. उरण, जि. रायगड } ---- अर्जदार

**विरुध्द**

**कोणीही नाही ---- सामनेवाला**

०१) मा. कोर्टाच्या स्थळसिमेंत व अधिकार क्षेत्रांत कै.श्री. नागा बुध्या उर्फ बुधाजी जोशी यांच्या मालकीच्या मौजे- बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड आणि मौजे- वेश्वी, ता. उरण, जि. रायगड येथे खालील वर्णनाच्या शेतजमीनी होत्या. सदर शेतजमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**परिशिष्ठ-अ**
**शेतजमीनींचे वर्णन**
**मौजे-बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड येथील**

| अ. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | भुधारणा पध्दती | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ७९ | ५ | भोगवटादार वर्ग-२ | ०-५०-४० पो.ख. ०-०२-३० **एकूण ०-५२-७०** | ८=१३ |

**परिशिष्ठ-ब**
**मौजे-वेश्वी, ता. उरण, जि. रायगड येथील**
**शेतजमीनींचे वर्णन**

| अ. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | भुधारणा पध्दती | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ६८ | ४/अ | भोगवटादार वर्ग-१ | ०-००-२० | ०=०० |
| २. | ६५ | २/ब | भोगवटादार वर्ग-१ | ०-०३-८० | ०=३७ |
| ३. | ६८ | ६/ब | भोगवटादार वर्ग-२ | ०-०२-८० पो.ख. ०-००-५० एकूण ०-०३-३० | ०=४४ |
| ४. | ५९ | २ | भोगवटादार वर्ग-१ | १८-००-०० | १८०=०० |
| ५. | ६६ | १ | भोगवटादार वर्ग-१ | ९-४०-०० | ९४=०० |

०२) कै.श्री. नागा बुध्या उर्फ बुधाजी जोशी यांचे दि. २६/०८/२०२१ रोजी निधन झाले असून, कै.श्री. नागा बुध्या उर्फ बुधाजी जोशी यांनी अर्जदार यांचे लाभांत लिहून दिलेल्या दि. ०६/०२/२०१९ रोजीच्या नोंदणीकृत मृत्यूपत्र दस्त क्र. उरन- ३४७/२०१९ बाबत प्रोबेट सर्टिफिकेट मिळावा म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज ना. कार्टात दाखल केला आहे.
०३) वरील अर्जदार यांस दि. ०६/०२/२०१९ रोजीच्या नोंदणीकृत मृत्यूपत्राचे प्रोबेट सर्टिफिकेट देण्यासंबंधी कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी स्वत: अगर त्यांचे वकीलांमार्फत त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मा. कार्टात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही, कसलीही, कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून मा. कोर्ट अर्जदार यांस कै.श्री. नागा बुध्या उर्फ बुधाजी जोशी यांनी अर्जदार यांचे लाभांत लिहून दिलेल्या दि. ०६/०२/२०१९ रोजीच्या नोंदणीकृत मृत्यूपत्राचे प्रोबेट सर्टिफिकेट प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १९ माहे मार्च २०२२ रोजी माझ्या सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकूमावरून

**लिपिक, दिवाणी न्यायालय, व.स्तर पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
ज्याअर्थी श्रीमती अलका राजेश ठाकूर, राहणार मु.पो. चिर्ले ता. उरण, जि. रायगड यांच्या मालकी वहीवाटीच्या मौजे-हरिश्चंद्र पिंपळे, ता. उरण, येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-हरिश्चंद्र पिंपळे, ता. उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १. | २२ | ४ | १-३६.१० पैकी विक्रीचे क्षेत्र ११ गुंठे | २१-६२ |

वर नमुद केलेली मिळकत म्हणजेच मौजे-हरिश्चंद्र पिंपळे, ता. उरण येथील सर्व्हे क्र. २२/४, एकुण क्षेत्र- १ हे - ३६ आर. १० पॉ. (११ गुंठे) ही मिळकत व सदर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतींचे मालक श्रीमती अलका राजेश ठाकूर यांच्या कडून आमचे अशिल मे. लॅन्डलॉर्ड कंपनी, पत्ता : ५०२, मयूरेश चेंबर, प्लॉट नं. ६०, सेक्टर - ११, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई यांनी कायम स्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू., हुकुमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील दामोदर परशुराम पाटील यांचे मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल,
दि. : २०/०३/२०२२

सही/-
**श्री.विशाल अनंत मुंडकर**
**ॲडव्होकेट**
पत्ता : शॉप क्र.२, पवन को-ऑप.हौसिंग सोसायटी, कै. रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टा समोर, पनवेल - ४१०२०६. जि. रायगड.

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
ज्याअर्थी श्रीमती गौरीबाई लक्ष्मण पाटील व बारसुबाई महादेव गावंड, राहणार मु.पो. वशेणी, ता. उरण, जि. रायगड यांच्या मालकी वहीवाटीच्या मौजे वशेणी, ता. उरण, येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेल्या जमिनी मिळकती आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वशेणी, ता. उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १. | ११७ | २४ | ०-१४.०० | ०-१६ |

वर नमुद केलेली मिळकत म्हणजेच मौजे - वशेणी, ता. उरण येथील सर्व्हे क्र. ११७/२४, एकुण क्षेत्र- ० हे - १४ आर. ०० पॉ. (१४ गुंठे) ही मिळकत व सदर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतींचे मालक श्रीमती गौरीबाई लक्ष्मण पाटील व बारसुबाई महादेव गावंड, यांच्या कडून आमचे अशिल मे. लॅन्डलॉर्ड कंपनी, पत्ता : ५०२, मयूरेश चेंबर, प्लॉट नं. ६०, सेक्टर - ११, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई यांनी कायम स्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू., हुकुमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील दामोदर परशुराम पाटील यांचे मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल,
दि. : २०/०३/२०२२

सही/-
**श्री.विशाल अनंत मुंडकर**
**ॲडव्होकेट**
पत्ता : शॉप क्र.२, पवन को-ऑप.हौसिंग सोसायटी, कै. रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टा समोर, पनवेल - ४१०२०६. जि. रायगड.

# बँकेत १ किलो १९९ ग्रॅम बनावट सोने तारण ठेवून पाच ग्राहकांनी बँकेला घातला ३४ लाख ५६ हजारांना गंडा

**नवी मुंबई दि. १९ : कामोठे येथील दि सह्याद्री सहकारी बँकेमध्ये ५ ग्राहकांनी १ किलो १९९ ग्रॅम वजनाचे बनावट सोने तारण ठेवून बँकेकडून एकुण ३४ लाख ५६ हजार रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणुक केल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे सोन्याचे मुल्यांकन करणाऱ्या बँकेच्या अधिकृत सोनारासोबत संगनमत करुन या सर्वांनी फसवणुक केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे कामोठे पोलिसांनी बँकेच्या मुख्य कार्यकरी अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पाच ग्राहकांसह सोन्याचे मुल्यांकन करणारा सोनार तसेच बँकेचा तत्कालीन व्यवस्थापक या सर्वांविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.**

कामोठे येथील दि.सह्याद्री सहकारी बँकेमार्फत गोल्ड लोनसह विविध प्रकारची कर्ज दिले जात असून गोल्ड लोन साठी येणाऱ्या कर्जदारांच्या सोन्याचे मुल्यांकन व तपासणी अरविंद अमृते हा सोनार करुन देत होता. त्यानुसार बँकेचे व्यवस्थापक हे सदर ग्राहकांना सोने तारण कर्ज मंजुर करत होते. बँकेतील खातेदार असलेली मिनाक्षी भोईटे या महिलेने २०१८ मध्ये २९९ ग्रॅम ६५० मिलीग्रॅम वजनाचे सोने तारण ठेवून बँकेकडून ९ लाख ९० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र सदर महिला कर्जाची रक्कम भरत नसल्याने बँकेने मनाक्षी भोईटे हिला संपर्क साधुन लेखी नोटीस पाठवून कर्जाची रक्कम भरण्यास सांगितले होते. मात्र सदर महिलेने बँकेच्या अधिकाऱ्यांना प्रतिसाद दिला नव्हता. त्यामुळे बँकेच्या अधिकाऱ्यांनी मिनाक्षी भोईटे हिला विश्वासात घेऊन तिच्याकडे विचारपूस केली, असता, बँकेतील सोन्यांचे मुल्यमापन व तपासणी करणारा सोनार अरविंद अमृते याने सदरचे कर्ज घेतल्याचे व सदरचे सोने देखील त्याचेच असल्याचे तिने सांगितले. त्यामुळे बँकेच्या अधिकाऱ्यांनी मिनाक्षी भोईटे हिने तारण ठेवलेल्या सोन्याचे दुसऱ्या सोनाराकडून तपासणी केली असता, ते बनावट असल्याचे आढळुन आले. त्यानंतर सोनार अमृते याने सोन्याचे मुल्यांकन करुन दिलेल्या इतर काही खातेदारांवर बँकेच्या अधिकाऱ्यांना संशय आल्याने, बँकेच्या अधिकाऱ्यांनी सोनार अरविंद अमृते याने मुल्यांकन केलेल्या व सदरचे कर्ज भरत नसलेल्या खातेदारांची माहिती काढली.

त्यानंतर त्या ग्राहकांनी तारण ठेवलेल्या सोन्याची दुसऱ्या सोनाराकडून तपासणी करुन घेतली असता, ते सोने देखील बनावट असल्याचे आढळुन आले. अशा पद्धतीने पाच ग्राहकांनी बँकेच्या अधिकृत सोनारासोबत संगनमत करुन बँकेत १ किलो १९९ ग्रॅम ४०० मिलीग्रॅम बनावट सोने तारण ठेवून त्याबदल्यात एकुण ३४ लाख ५६ हजार रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणुक केल्याचे आढळून आल्याने बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश कोरडे यांनी या सर्वांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

मिनाक्षी भोईटे या महिलेने २९९ ग्रॅम ६५० मिलीग्रॅम बनावट सोने तारण ठेवून त्यावर बँकेकडून ९ लाख ९० हजार रुपये कर्ज घेतले आहे. तसेच शफी अजीम पटेल याने १८९ ग्रॅम ३०० मिली बनावट सोने तारण ठेवून ५ लाख १ हजार रुपये कर्ज घेतले आहे. त्याचप्रमाणे शफी पटेल याची पत्नी शगुफ्ता पटेल हिने १२३ ग्रॅम ३०० मिली बनावट सोने तारण ठेवून सव्वा तीन लाखांचे कर्ज घेतले आहे. तसेच वैभव रमाकांत गिरधर याने २५६ ग्रॅम ५५० मिली बनावट सोने तारण ठेवून ६ लाख ३८ हजार रुपयांचे कर्ज घेतले आहे. त्याचप्रमाणे सचिन रमेश पगडे याने ३३० ग्रॅम ६०० मिली बनावट सोने तारण ठेवून १० लाख २ हजार रुपयांचे कर्ज घेतल्याचे आढळुन आले आहे.

# वलंग ते आदीस्ते रस्त्याचे भूमिपूजन
## आ. भरतशेठ गोगावले यांच्या प्रयत्नाला यश



महाड, दि.१९ : खाडी पट्टा विभागातील आदीस्ते मुळगावाकडे जाणारा रस्ता बऱ्याच दिवसांपासून रखडला होता अनेक राजकीय पक्षाच्या नेत्यांनी भाषणे ठोकून आश्वासने देऊन गेले पण रस्ता करण्यासाठी प्रयत्न भरतशेठ शिवाय कोणीही केले नाही.

लोकप्रिय कार्यसम्राट आमदार भरतशेठ गोगावले यांनी प्रयत्न केले आणि रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली,शिवसेना ही ८०%समाजकारण आणि २०%राजकारण समाजाला उपयोगी पडेल तेवढेच राजकारण करणारी आणि दिलेला शब्द पाळणारी बाळासाहेबांची संघटना आहे.

या कार्यक्रमासाठी उपस्थित जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र सावंत, संपर्क प्रमुख एकनाथ सुकूम, पंचायत समिती सदस्य शोएब पाचकर,विभाग प्रमुख कृष्णा सुकूम,तसेच भाजपचे जयवंत दळवी,शिवसेना युवासेनेचे आजी माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी इत्यादी उपस्थित होते.

# कळंबोली लोह पोलाद बाजाराच्या इमारतीमधील गाळ्याला लागली आग



पनवेल दि.१९ (वार्ताहर): कळंबोली लोह पोलाद बाजाराच्या इमारतीमधील गाळ्याला शॉर्टसर्किटमुळे आग लागली. तेथील कागदपत्रे त्याचबरोबर २ संगणक, २ प्रिंटर, २ झेरॉक्स मशीन, ६ लॅपटॉप जळून खाक झाले. आग विझवण्यासाठी कळंबोली येथील अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहोचले. मात्र आतमध्ये जाण्यासाठी जागा नसल्याने वेळेमध्ये आग विझवता आली नाही. अग्निशमन बंबाला वळसा घालून त्या ठिकाणी जावे लागल्याची माहिती अग्निशमनच्या अधिकाऱ्यांनी दिली. कळंबोली स्टील मार्केट मधील फॅसिलिटी सेंटर समोरील रस्ता बाजार समितीने बंद केला आहे. त्यामुळे या ठिकाणी वाहनांना ये-जा करता येत नाही. या ठिकाणी आग लागली असताना अग्निशमन बंब आला. येथे येण्यासाठी अनेक अडथळे पार करावे लागले. या आगीत गाळ्यामधील अनेक वस्तू जळून खाक झाल्या. लोहपोलाद बाजार कलंबोली याठिकाणी सिडकोने हा बाजार विकसित केला. आशिया खंडातील सर्वात मोठे लोहपोलाद मार्केट हे असून याठिकाणी सिडकोने फॅसिलिटी सेंटर बांधले. येथेच लोह पोलाद बाजार समितीचे कार्यालय आहे. त्याचबरोबर दोन बँका आणि पनवेल आरटीओ चे ऑफिस आहे. या सेंटरच्या समोरील रस्ता सिमेंटचे ब्लॉक लावून गेल्या कित्येक महिन्यांपासून बंद करण्यात आला आहे. कित्येक दिवस झाले तरी हा रस्ता रहदारीसाठी खुला करण्यात आला नाही. त्यामुळे अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

# उक्रुळ येथे बैलगाडी शर्यतीत चेंगराचेंगरी मध्ये एकाचा मृत्यू

**कर्जत दि.१९ (जयेश जाधव) : तालुक्यात उकरूळ ग्रामस्थांनी बैलगाड्यांच्या शर्यतीचे आयोजन केलं होतं धुळवडीचा सणानिमित्ताने शंभर बैलगाड्यांच्या जोडेची हजेरी लावली होती. उक्रुळ ग्रामस्थांनी बैलगाड्यांच्या शर्यती आयोजित केल्या होत्या. धुळवडीची सुट्टी असल्याने बैलगाड्यांच्या शर्यती पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.**



सकाळी दहा वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत शर्यती चालू होत्या दुपारच्या वेळेस बैलगाडी सोडल्याच्या जागेवरून बैलगाडी जोडप्यांचे पट्ट्याच्या बाहेर शेकडा साईट पट्टी सोडून उभे असलेले नागरिकांच्या अंगावर व तिथे झालेल्या पळापळी व चेंगराचेंगरी मध्ये दौलत देशमुख हा इसम मोठ्या प्रमाणात जखमी झाला होता बैलगाड्यांच्या धडक लागल्यामुळे तो इसम एकच ठिकाणी वीस ते तीस मिनिट जागेवर पडून होता त्यावेळी एका व्यक्तीने त्याला स्वतःच्या गाडीत घेऊन रायगड हॉस्पिटल ला नेले डोक्याला जास्त मार असल्याने त्यांना पुढे नेण्यास सांगितले पनवेल येथे गांधी हॉस्पिटलमध्ये दाखल होताच त्वरित उपचार सुरू केले असता उपचारादरम्यान काही तासातच त्यांचा मृत्यू झाला. डॉक्टरांनी मृत घोषित केले बैलगाड्यांच्या शर्यतीचे आयोजन करणारा व तिथे कमिटीने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचं आहे डॉक्टर ॲम्बुलन्स असणे गरजेचे असून तेथे ना डॉक्टर, ॲम्बुलन्स अशी कोणतेही प्रकारची सोय नव्हती. त्यामुळे तिथे चेंगराचेंगरी मध्ये दौलत देशमुख या इसमाचा मृत्यू झाला आहे. प्रशासनांना विनंती आहे. अशा आयोजकांवर कारवाई झाली पाहिजे प्रशासन कोणत्या नियमाप्रमाणे परवानगी दिले जाते त्या नियमांचे पालन करत आहेत का नाही हे पाहणे पोलिसांचे काम आहे : **ज्ञानेश्वर साळोखे,राष्ट्रीय उपाध्यक्ष, समस्त सामाजिक अपराध नियंत्रण एंव भ्रष्टाचार विरोधी संस्था फाउंडेशन**

# डोक्यावर सळईने मारून केले जखमी

**पनवेल दि.१९ (वार्ताहर): लेबर कॉन्ट्रॅक्टर गावाहून आले की तुमचा पगार करतील या गोष्टीचा राग आल्याने मिस्त्री काम करणाऱ्या नितीन शाहू यास सळईसारख्या वस्तूने मारून दोघाजणांनी जखमी केले आहे. कृष्णा पाईक आणि जरुल याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.**

नितीन थय्या शाहू हा वाकडी येथे मिस्त्री काम करतो. त्याचा मामा किशोर साहू बांधकाम व्यवसायिक आहे. यावेळेस सिमेंट उद्या येणार आहे, तुम्ही उद्या कामावर या असे त्यांनी सांगितले. त्यावेळी कृष्णा पाईक आणि जरूल यांनी पगार वेळेवर देत नाही तर कामावर येणार नाही असे सांगितले. त्यानंतर त्यांचा मामा कॉंट्रॅक्टर किशोर शाहू हा गावाहून आला की पगार करतील असे सांगितल्याने याचा राग कृष्णा पाईक आणि जरूल याला आला आणि त्यांनी नितीन शाहू याला हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर अंधारात डोक्यावर सळईसारख्या वस्तूने मारले. त्यानंतर कृष्ण पाईक व जरूल हे पळून गेले. नितीन शाहू याच्यावर एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचार सुरू आहेत.

# फ्लॅट भाड्याने न देता केली फसवणूक

**पनवेल दि.१९ (वार्ताहर): भाडेकराराचे रजिस्ट्रेशन करून सदरचा फ्लॅट भाड्याने न देता तो दुसऱ्याला भाड्याने दिला व तीन लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.**

जुई गाव, कामोठे येथील सोना श्रवण गुप्ता या नवीन घराच्या शोधात होत्या. संदीप मिश्रा याने अमित सुरेश पवार, चंद्रकांत बापू नागरे, उत्तम कांबळे यांच्यासह रूमच्या व्यवहारावर बोलणे झाले, त्यांच्यात १७ लाखाला रूमचा व्यवहार ठरला. त्यानंतर त्यांच्यात रजिस्ट्रेशन करण्यात आले. सोना गुप्ता यांनी एकूण चार लाख ७५ हजार रुपये त्यांना दिले. मात्र त्यांनी रूमचा ताबा दिला नाही. त्यांच्याकडे पैसे परत मागितले असता दोन चेक दिले, मात्र चेक बाऊन्स झाले. चंद्रकांत नागरे यांनी त्यांना तीस हजार रुपये परत दिले. त्यांनी केलेले रजिस्ट्रेशन गुप्ता यांनी पाहिले असता रजिस्ट्रेशन हे भाडेतत्त्वावरील असून सदरचा करार केल्यानंतर ती रूम गुप्ता यांना भाड्याने न देता दुसऱ्या इसमाला भाडेतत्त्वावर दिली. त्यामुळे संदीप मिश्रा(कामोठे), अमित सुरेश पवार (कामोठे), चंद्रकांत बापू नागरे (कामोठे), उत्तम कांबळे (नावडे), सुरेश रघुनाथ पवार (कामोठे) यांच्याविरोधात तीन लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# महागडा मोबाईल चोरणाऱ्या अल्पवयिन मुलास पनवेल शहर पोलिसांनी घेतले ताब्यात

**पनवेल दि.१९ (संजय कदम): एका महिलेच्या हातातील महागडा मोबाईल खेचून पसार झालेल्या एका अल्पवयिन मुलास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची बाल सुधारगृह कर्जत येथे रवानगी केली आहे.**

अंकिता बडे या रात्रीच्या वेळी दरबार वाईन परिसरातील रस्त्यावरून मोबाईल वर बोलत जात असताना सदर अल्पवयिन मुलाने त्यांच्याकडे असलेला ५० हजारांचा आयफोन लंपास केला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कादबाने व गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, पोलिस हवालदार रविंद्र राऊत, पोना विनोद देशमुख, पोशि प्रसाद घरत, पोशि विवेक तारासूर, पोना परेश म्हात्रे, पोना महेंद्र वायकर आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे या आरोपीचा शोध घेतला असता सदर मुलगा हा रेल्वे स्टेशन परिसरात वावरत असल्याचे आढळून आल्याने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले आहे.

# पद्मश्री डॉ.बावस्करांचा दरेकरांच्या हस्ते सत्कार
## 'डॉ.बावस्करांचा पुरस्कार हा कोकणचा सन्मान'



महाड दि.१९ : विंचु दंशावर संशोधन करुन समाजाला मोठ्या संकटातून वाचविणाऱ्या डॉ. हिंमतराव बावस्कर यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा कोकणाचा सन्मान आहे. तसेच हा पुरस्कार दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आणि शिफारस केल्याबद्दल राज्य सरकारचे धन्यवाद प्रविण दरेकर यांनी व्यक्त केले.

खांदेशे सुपुत्र डॉ हिंमतराव बावस्कर यांनी कोकणात येऊन विंचु दंशाने मरणाऱ्या गोरगरीबांसाठी संशोधन करुन मोठे कार्य केले. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य सरकारने केंद्राकडे शिफारस करुन त्यांना पद्मश्री ने सन्मानित केले. आज विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार केला. या प्रसंगी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, उपजिल्हाध्यक्ष अक्षय ताडफळे, महिला उपजिल्हाध्यक्षा डॉ मंजुशा कुद्रीमोती, बेटी बचाव बेटी पठाव सेलच्या अध्यक्षा निलीमा भोसले, सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, संदिप ठोंबरे, तुषार महाजन, श्रध्दा भोसले, नमिता दोशी, मनोज धामनसे आदि असंख्य मान्यवर उपस्थित होते. दरम्यान बोलताना दरेकर यांनी महाड उपजिल्हा रुग्णालयाची मागणी करणारीत थेट आरोग्य मंत्री राजेश टोपेंना फोन लावला. या वेळी सर्व प्रकारची साधने महाड ग्रामीण रुग्णालयाला पुरवणार आणि मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार उपजिल्हा रुग्णालय करण्याचे आश्वासन त्यांनी दरेकरांना दिले. तसेच या कामी महाडकरांनी पाठपुरावा करावा असे दरेकर म्हणाले. तसेच अधिवेशनात ग्रामीण भागातील शासकीय डॉक्टरांना पगार वाढ देण्याबाबत मागणी करणार असल्याचे दरेकर या वेळी म्हणाले.

# ह भ प वैभव महाराज पवार यांची नर्मदा परिक्रमा यशस्वी

**चौक दि.१९ (अनिल भरतूक) : श्री क्षेत्र ओंकारेश्वर पासून सुमारे तीन हजार सहाशे कि. मी. च्या पायी नर्मदा परिक्रमेचा प्रवास ह.भ. प. वैभव महाराज पवार यांनी पार पडला. यावेळी बोलताना पवार यांनी अतिशय खडतर कठीण असणारी परिक्रमा पूर्ण करताना येणारे अनुभव कथन केले श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथून दिनांक २४ नोव्हेंबर मध्ये सुरुवात केली असून मध्य प्रदेश, गुजरात, आणि महाराष्ट्रातील काही भागातून पायी चालत समुद्र तट मार्गे पुन्हा उत्तर तटावर आले तेथून नर्मदा मौर्य उगम स्थान अमरकंटक येथे दिनांक ७ मार्च रोजी श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे पुन्हा येऊन परिक्रमा पूर्ण केली व आपल्या गावी चौक येथे त्यांनी आगमन केले.**

नर्मदा परिक्रमा पूर्ण झाल्यावर आनंदाश्रू वाहू लागले संपूर्ण परिसराचे व उगम स्थानाचे पूजन करून जो ध्यास घेतला होता तो पूर्ण झाल्याने मन भरून आले वैभव महाराज पवार यांनी आपला परिवार मागे सोडत गेले तीन-चार महिने अखंड अध्यात्मात आपले जीवन झोकून दिले होते. प्रत्येक वेळी आपल्या सुश्राव्य किर्तनातून अध्यात्माची गोडी लागावी व आपले जीवन परमार्थासाठी काहीतरी केले पाहिजे हे सांगताना नर्मदा परिक्रमेचा आपण विचार करीत असून ते पूर्ण करणे हेच आपले पुढे ध्येय असणार आहे आपले गुरुवर्य वडील ह.भ. प. गोपाळ महाराज पवार यांच्या आशीर्वादाने व त्यांच्या मार्गदर्शनाने मी हा प्रवास यशस्वी केला आहे, असे ते म्हणाले.

**नियमीत वाचा दैनिक किल्ले रायगड**

**साक्षर रायगडःस्वयंपूर्ण रायगड**

# हायवेवरून टँकर २० फूट खाली कोसळला

**पनवेल दि,१९ (संजय कदम): पुण्याहून मुंबईला निघालेल्या केमिकल भरलेला टँकर एक्सप्रेस हायवेवरील पनवेलजवळील नेवाळी ब्रिजजवळ आला असता चालकाच्या हलगर्जीपणामुळे रस्तासोडून २० फूट खाली कोसळल्याने टँकरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**



या अपघातात चालक अरविंद यादव याला आपला जीव गमवावा लागला आहे. या अपघातात टँकरची पुढील चाके निखळली असून बाजूला फेकली गेली आहेत. यावरून या अपघाताची भीषणता दिसून येते. चालक अरविंद यादव वय ४२ हा हाजीमलंग रोड कल्याण येथील रहिवासी आहे. सदर अपघाताबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे पनवेल येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नऊ मांजरांचा मृत्यू, गुन्हा दाखल

पनवेल दि.१९ (वार्ताहर): मांजरांना जाणीवपूर्वक क्रूरपणे वागणूक देऊन त्यांना आवश्यक अन्न पाण्याची व्यवस्था न केल्याने नऊ मांजरांचा मृत्यू झाल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मालकीण संगीता यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पान १ वरुन पुढे चालू

# द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल रोड ट्रिप मोहीम यशस्वी
## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले कौतुक

ध्येय आहे जे एक नेटवर्क प्लॅटफॉर्म आहे ज्याचे नेतृत्व तिचे संस्थापक संचालक रिंकी वनमोरे, सुश्री मदीहा शेख आणि कौस्तव घोष करतात. मोहिमेचे कारण लहान व्यवसायांना पाठिंबा देणे आणि त्यांचे ब्रँड आणि प्रयत्न ओळखणे हे असून द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल या मोहिमेमध्ये एक संघ असून त्यामध्ये कौस्तव घोष हे संस्थापक, लक्ष्मी सोरते सह-संस्थापक, आर्या नायर जनसंपर्क आणि विपणन, भाविक देशमुख नेव्हिगेटर, अनित कौर बंगा विचारवंत, संशोधन आणि विकास, रितांशू शर्मा मीटिंग समन्वयक, सावराब समता वेबसाइट विकसक, तरुण मिश्रा ग्राफिक डिझायनर/ व्हिडिओ मेकर, अभिषेक वाळेकर वाहन ब्रँडिंग, शीतल सिरसीकर वाहन ब्रँडिंग म्हणून काम पाहतात.

# प्राचीन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. मंगेश डाके यांचे गरीब रुग्णावर उपचार

डॉक्टर डाके यांनी तात्काळ राज कातकरी याला आपल्या प्राचीन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये बोलावून तपासले असता राज यांच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर असल्याचे लक्षात आले. डॉक्टर मंगेश डाके यांनी राज कातकरी या आठ वर्षीय रुग्णावर तात्काळ उपचार केले. या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहता येणाऱ्या उपचार खर्चामध्ये भरघोस सवलत दिली. यामुळे कातकरी कुटुंबाच्या चेहऱ्यावर हास्य पाहायला मिळाले. त्यांनी डॉक्टर मंगेश डाके यांचे आभार मानले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. प्रमोद लक्ष्मण वालेकर यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, प्लॉट नं. ४५६/ए-१, कर्नाळा भवन, सहकारी भात गिरणी जवळ, सहकार नगर, पनवेल ४१० २०६, ता. पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र), येथे छापून दैनिक किल्ले रायगड कार्यालय, ११ साहील सोसायटी, सिटी पोस्ट ऑफीस समोर, एम. पी. रोड, पनवेल ४१० २०६, ता. पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. कार्यालयीन फोन नं.:(022) 2745 9673, Email: killeraigad@gmail.com. ❐ RNI Regn. No. 16725/67.